नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/१०/२०२६ (शुक्रवार)

ट्रान्सफॉर्मर मधील आईल चोरीचे २ गुन्हे उघड, २ आरोपी अटक
२१ लाख ७५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
स्थानिक गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक ३०/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने महावितरणाचे विद्युत लाईनचे ट्रान्सफॉर्मर मधील आईल चोरीचे ०२ गुन्हे उघड करून २१,७५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागातील अउघड गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, **पो.स्टे. वडोदा अप. क्र. ४०५/२०२६ कलम ३०३(२) भान्यास** या ट्रान्सफॉर्मर आईल चोरीचे गुन्हयामध्ये एका पांढऱ्या रंगाचे एमजी हेक्टर क्र. ९२८२ वाहनाचा वापर झाला आहे. सदर वाहनाचा आणि आरोपींचा गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने शिताफीने शोध घेवुन दिनांक ३०/१०/२०२६ रोजी पाटणकर चौक नगर, नागपुर येथे एमजी हेक्टर वाहन क्र. एम.एच — ०५/ई क्यु —९२८२ हे वाहन पकडले. नमुद वाहनात **आरोपी क्रं १) रमणदिपसिंग अमृतसिंग रणधावा, वय ४० वर्ष, रा.प्लॉट न. ०३ बाबादिप नगर, गुरूव्दारा जवळ, कपील नगर नागपुर आणि त्याचा साथीदार आरोपी क्रं २) कमल रामस्वरूप शर्मा, वय ५५ वर्ष, रा. प्लॉट नं. १३० बाबाविक्तुनगर, पाटणकर चौक नागपुर** हे दोघे मिळुन आले. नमुद आरोपींना कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन वडोदा आणि मौदा हद्दीतुन महावितरणाचे

विद्युत लाईनचे ट्रान्सफॉर्मर मधील आईल चोरी केल्याचे व चोरी करून ट्रान्सफॉर्मर मधील आईल हायवे रोडवरील येणारे जाणारे ट्रक वाहन चालकांना विकल्याचे माहीती दिली.

पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हा करतांना वापरलेले वाहन १) एक एमजी हेक्टर वाहन क्र. एम.एच ०५ ई क्यु –९२८२ अंदाजे किंमती २०,००,०००/– रूपये, २) २ अॅड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/– रूपये आणि ३) ऑईल विक्रीची रोख रक्कम १,५५,०००/– रूपये असा एकुण २१,७५,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

उघडकीस आलेले गुन्हे–:

१) पोलीस ठाणे वडोदा अप. क्र. ४०५/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं
२) पोलीस ठाणे मौदा अप क्र. ७२१/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पोलीस स्टेशन काटोल :– फिर्यादी यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप क्र. ३८०/२०२१ कलम ३५४, ३५४ (अ), ४५१ भादवि सह कलम ८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०९/०८/२०२१ रोजी यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्षे ही घरात एकटी असतांना यातील आरोपी परमेश्वर विठोबाजी कोटनाके, वय ४० वर्षे, रा बोरी, ता. काटोल याने फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला अश्लिल स्पर्श करून तिला पलंगावर ढकलुन तिचा विनयभंग केला असता अल्पवयीन पिडीता त्याच्या हाताला चावा घेवुन तेथुन पळुन गेली. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन काटोल येथे वरप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तपासी अधिकारी श्रीमती अश्विनी वानखेडे, पोलीस उपनिरीक्षक, काटोल यांनी सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास केला.त्यानंतर श्री संतोष निंभोरकर, पोलीस उपनिरीक्षक, काटोल यांनी तपास केला तसेच सदर प्रकरणाचा पुढील तपास श्री आकाश शाही, पोलीस उपनिरीक्षक , काटोल यांनी करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १३ श्री एन. आर. तळेकर यांनी नमुद आरोपीस कलम ३५४ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ४०००/–

रुपये दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा करावास ,कलम ४५१ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास २ आठवडे साधा कारावास तसेच कलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ४०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. शाहजहा शेख यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग,पोलीस निरीक्षक श्री रणजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण ,पोहवा बाबा नेवारे ब. नं. ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार अमित रमेश रोडे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील सराईत गुन्हेगार नामे अमित रमेश रोडे, वय ३७ वर्षे, रा. इंदोरा, ता. मौदा, जि. नागपूर, याला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नमुद आरोपी याचेवर रेती चोरीचे तसेच महीलांविरूध्द चे **गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे विरूध्द तक्रार प्राप्त होताच कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. असे गुन्हे करून शासनाचा महसुल बुडवतो तसेच आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे अरोली पोलीसांनी नमुद सराईत गुन्हेगाराचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपीला **३ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.



हद्दपार आरोपी अमित रमेश रोडे

अवैध दारू निर्मिती, विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर २२ गुन्हे दाखल,

दिनांक २९/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २२ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन अरोली येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०७ गुन्हे नोंद आहे.

नमुद कारवाईत एकुण ११२५० मिली देशी दारू, ३० लीटर मोहाफुल दारू असा एकुण ८,०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर